प्रेसनोट दिनांक ०५/०६/२०१९

## विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणेशहर.

## विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या पोलीसांकडुन वाहन चोरास अटक.

दिनांक ०३/०६/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक व्ही व्ही जाधव, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे, पोलीस शिपाई प्रशांत शिंदे व पोलीस नाईक आढारी यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणेशहर गु.र.नं. १२२/२०१९, भा.द.वि.सं.कलम ३७९ या वाहन चोरीच्या गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी नामे गणेश राजू वाघिरे, वय १९ वर्षे, रा. महात्मा गांधी वसाहत, संगम ब्रिजच्या खाली, पुणे हा पाटील इस्टेट झोपडपट्टी, शिवाजीनगर पुणे याठिकाणी आलेला असल्याचे समजले. सदर गोपनीय माहितीचे आधारे तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक व्ही व्ही जाधव, पोलीस नाईक बाबा दांगडे, पोलीस शिपाई संजय बनसोडे, पोलीस शिपाई प्रशांत शिंदे व पोलीस नाईक आढारी यांनी पाहिजे असलेला आरोपी गणेश राजू वाघिरे याचा कसुन शोध घेवून त्याचेबाबत माहिती संकलित करुन व सापळा रचून सदर आरोपीस ताब्यात घेवून त्याचेकडुन विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणेशहर गु.र.नं. १२२/२०१९, भा.द.वि.सं.कलम ३७९ हा उघडकीस आणलेला आहे.

तसेच वरनमुद आरोपी गणेश राजू वाघिरे याचेकडे सखोल तपास करुन त्याचेकडुन चोरीच्या गुन्हयातील १८,०००/- रु. किंमतीची एक लाल रंगाची मोटारसायकल नंबर एम एच १९ ए झेड ६९४७ ही हस्तगत करुन त्यासंदर्भात दाखल असलेला विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणेशहर गु.र.नं. १७३/२०१९, भा.द.वि.सं.कलम ३७९ हा वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणुन उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणेशहर.